**महाराष्ट्र शासन**
**राज्य सेवा हक्क आयोग, अमरावती विभाग,**
कार्य आयोजना इमारत, पहिला मजला, वन विभाग, ऊर्ध्व वर्धा प्रकल्प वसाहत मार्ग, कॅम्प,
अमरावती- ४४४ ६०२.
**ई-मेल :-** crtsamravati@maharashtra.gov.in / rtsamravati@gmail.com

---

क्रमांक : लोक से.ह.आ.अम./कक्ष-४/कावि-११६/२०२४ दिनांक :२६.०२.२०२४

**प्रति,**
**मा. संचालक,**
**माहिती व तंत्रज्ञान संचालनालय,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई.**

विषय :- सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची करार पध्दतीने नेमणूक करण्याकरिता जाहिरात देण्याबाबत ...
संदर्भ :- सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.: संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६

महोदया,

सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१७.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार, शासकीय/ निमशासकीय सेवेतुन गट ब (राजपत्रित / अराजपत्रित) व तत्सम सेवेतुन सेवानिवृत्त झालेले वरिष्ठ लेखा अधिकारी/ लेखा अधिकारी/ सहायक लेखाधिकारी {(परिक्षण) (Audit)} अथवा तत्सम पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी यांची राज्य सेवा हक्क आयोग, अमरावती विभाग, अमरावती येथे करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे. त्याकरिता सोबत जोडलेल्या जाहिरातीबाबतचा अधिक तपशिल व अर्जाचा नमुना शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा, ही विनंती.

**(अनिल खंडागळे)**
उप सचिव,
राज्य सेवा हक्क आयोग, अमरावती.

सहपत्र :- वरीलप्रमाणे

**शासकीय/ निमशासकीय सेवेतून गट ब (राजपत्रित / अराजपत्रित) पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची सेवा "विवक्षित कामासाठी" करार पध्दतीने उपलब्ध करुन घेण्याबाबत जाहिरात.**

**राज्य सेवा हक्क आयोग, अमरावती विभाग, अमरावती,**
**कार्य आयोजना इमारत, पहिला मजला, वन विभाग,**
**ऊर्ध्व वर्धा प्रकल्प वसाहत मार्ग, कॅम्प, अमरावती- ४४४ ६०२.**

शासकीय/ निमशासकीय सेवेतुन गट ब (राजपत्रित / अराजपत्रित) व तत्सम सेवेतुन सेवानिवृत्त झालेले वरिष्ठ लेखा अधिकारी/ लेखा अधिकारी/ सहायक लेखाधिकारी {(परिक्षण) (Audit)} अथवा तत्सम पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा ६ महिन्यासाठी करारपध्दतीने उपलब्ध करण्याबाबत नामिकासूची करण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचे स्वरुप | वय, अर्हता व अनुभव | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | गट "ब" (राजपत्रित/अराजपत्रित) व तत्सम | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत कार्यालय परिक्षण, तत्सम व अनुषंगिक कामे | ➢ वयोमर्यादा - ५८ ते ६५ वर्षापर्यंत.<br>➢ उमेदवारास शासकीय/ निमशासकीय सेवेतील वित्तीय / प्रशासनिक कामाचा अनुभव असावा.<br>➢ उमेदवारास संगणक हताळण्याचे ज्ञान असावे.<br>➢ अर्हता - पदवीधर | १<br>(३ अधिकाऱ्यांची नामिका सूचि तयार करण्यात येईल ) |

**नियुक्तीच्या अटी व शर्ती :**

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७ डिसेंबर, २०१६ अन्वये नमूद अटी व शर्तीच्या आधारे नियुक्ती करण्यात येईल. सदर शासन निर्णयानुसार मासिक परिश्रमिक व भत्ते निश्चित करण्यात येतील.
२) पात्रता व गुणवत्तेनुसार ३ अधिकाऱ्यांची नामिका सूचि तयार करण्यात येईल.
३) करार पध्दतीने राज्य सेवा हक्क आयोग, अमरावती विभाग, अमरावती या कार्यालयामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींना कोणतेही पदनाम असणार नाही व अर्जित, नैमित्तिक व वैद्यकीय रजा अनुज्ञेय असणार नाही.
४) नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तींची असेल.
५) करार पध्दतीने नियुक्ती करावयाच्या अधिकाऱ्यास अमरावती महसूल विभागांतर्गत अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम व बुलडाणा जिल्ह्यांमध्ये तसेच मुंबई येथे प्रस्तावित कामाच्या आवश्यकतेनुसार दौरे करावे लागतील.
६) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय / वित्तीय अधिकार असणार नाहीत. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र / आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र राहणार नाही.
७) मुलाखतीव्दारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, अमरावती यांचा राहिल. मुलाखतीचा दिनांक अर्जदारांना कळविण्यात येईल.
८) उपरोक्त अटी व शर्तीसोबत सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१७.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

इच्छूक सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यांनी शारीरिक व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याचे प्रमाणपत्र, आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून दि.११.०३.२०२४ रोजी सायं. ०६.१५ वाजतापर्यंत त्यांचे अर्ज विहित नमुन्यात खाली नमूद पत्त्यावर पोस्टाव्दारे, व्यक्तीशः अथवा ई-मेल (**crtsamravati@maharashtra.gov.in**) व्दारे सादर करावेत.

संपर्क :- राज्य सेवा हक्क आयोग, अमरावती विभाग, अमरावती , कार्य आयोजना इमारत, पहिला मजला, वन विभाग, ऊर्ध्व वर्धा प्रकल्प वसाहत मार्ग, कॅम्प, अमरावती- ४४४ ६०२.

ई-मेल :- **crtsamravati@maharashtra.gov.in**

उप सचिव,
राज्य सेवा हक्क आयोग, अमरावती
विभाग,

**नियुक्तीच्या अटी व शर्ती:-**

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६अन्वये नमूद अटी व शर्तींच्या आधारे नियुक्ती करण्यात येईल. सदर शासन निर्णयानुसार मासिक परिश्रमिक व भत्ते निश्चित करण्यात येतील.

२. करार पध्दतीने राज्य सेवा हक्क आयोग, अमरावती विभाग, अमरावती या कार्यालयात नियुक्त केलेल्या व्यक्तींना कोणतेही पदनाम असणार नाही व अर्जित, नैमित्तिक व वैद्यकिय रजा अनुज्ञेय असणार नाही.

३. नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीची असेल.

४. करारपध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय / वित्तीय अधिकार नसतील, अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र / आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही.

५. अर्जदार वरिष्ठ लेखा अधिकारी/ लेखाधिकारी/ सहायक लेखाधिकारी (गट-ब) या पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा.

६. गट-ब (ग्रेड पे ७६००/- पेक्षा कमी) पदावरील प्रशासकीय / वित्तीय कामकाजाचा अनुभव व संगणक हाताळण्याचे पुरेशे ज्ञान असणे आवश्यक आहे.

७. अर्जदाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

८. आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सोबतच्या विहित नमुन्यात अर्ज करावा.

९. अर्जदार शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच तो निर्व्यसनी असावा.

१०. अर्जदाराविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसावी अथवा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

११. अर्जदारांनी विहित दिनांकाच्या आत अर्ज सादर करावा, विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार व कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच नियुक्तीची प्रक्रिया कोणत्याही टप्यात रद्द करण्याचे अधिकार विभाग प्रमुख यांना राहतील.

१२. मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, अमरावती यांचा राहील. मुलाखतीचा दिनांक अर्जदारांना कळविण्यात येईल.

१३. करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यास राज्य सेवा हक्क आयोग, अमरावती येथे काम करावे लागेल. तसेच प्रस्तावित कामाच्या आवश्यकतेनुसार अमरावती महसूल विभागांतर्गत अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम व बुलडाणा जिल्ह्यांमध्ये तसेच मुंबई येथे दौरे करावे लागतील.

१४. सदर नियुक्ती ६ महिने कालावधीकरिता करण्यात येणार आहे. कामाची आवश्यकता असल्यास व कामकाज समाधानकारक असल्यास मुदतवाढ देण्याबाबतचा अधिकार विभाग प्रमुखांना राहील.

१५. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आल्यामूळे शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/ सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचे इतर कोणतही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

१६. करार पध्दतीने नियुक्ती केलेल्या अधिकाऱ्यास नेमून दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी राहील.

१७. नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१८. करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीत सोपवलेली कामे पार पाडण्यात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यवसायिक कामात गुंतता येणार नाही.

१९. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध जाहिर करणे आवश्यक राहील.

२०. करार पध्दतीच्या कालावधीत आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळेच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

२१. सोपविलेले कामकाजाचा वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करण्यात येईल.

२२. करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीत कामकाजा दरम्यान प्राप्त होणारी कागदपत्रे/ माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहील.

२३. उपरोक्त अटी व शर्तीसोबतच सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

*****************************

# अर्जाचा नमुना

## करार पध्दतीने नियुक्तीसाठी अर्ज

(शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६)

| उमेदवाराने अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे |
|---|

१) अर्जदाराचे संपूर्ण नाव :-

२) अर्जदाराचा पत्ता :-

३) भ्रमणध्वनी क्रमांक :-

४) ई-मेल आयडी :-

५) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :-

६) जन्म दिनांक :-

७) सेवानिवृत्ती दिनांक :-

८) शैक्षणिक अर्हता :-

९) अनुभव :-

| अ.क्र. | यापूर्वी काम केलेल्या विभागांची नावे | कालावधी | कामाचे स्वरुप / विषय |
|---|---|---|---|
| | | | |

१०) विशेष उल्लेखनीय काम :-

(जाहिरातीमध्ये नमूद केलेले पद) या पदावर करार पध्दतीने नियुक्ती बाबतची जाहिरात / अटी व शर्ती मी काळजीपूर्वक वाचल्या असून करार पध्दतीने नियुक्तीबाबतच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो / करते की, वरील सर्व माहिती सत्य असून सदर माहिती चुकीची आढळून आल्यास होणाऱ्या कार्यवाहीस मी जबाबदार राहीन याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

(अर्जदाराचे नाव व सही )